# Best Practice: Sanjeevani Health Card Scheme

## News Paper Coverage Prints

सकाळ



सातवे : उपक्रमांचा प्रारंभ करताना डॉ. स्वाती पाटील, ऐश्वर्या कांबळे, माणिक पाटील, मोहन पाटील, उत्तम नांगरे व इतर.

### 'संजीवनी मल्टिपर्पज'तर्फे सातवेत विविध उपक्रम

सातवे, ता. ७ : येथे संजीवनी मल्टिपर्पज फाउंडेशन व ग्रामपंचायतीतर्फे समाजापयोगी उपक्रमांना प्रारंभ झाला. फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. दीपक पाटील यांच्या सुवर्णमहोत्सवी वाढदिवस वर्षानिमित्त वर्षभरात दर महिन्याच्या २५ तारखेला कार्यक्रम होतो. येथे औषध वितरण, ८० नागरिकांची आरोग्य तपासणी, वृक्षारोपण व भगतसिंग चौक, शिवाजी चौकात स्वच्छता मोहीम राबविली.

फाउंडेशनच्या सचिव डॉ. स्वाती पाटील, सरपंच ऐश्वर्या कांबळे यांच्या हस्ते धन्वंतरी पूजन प्रारंभ झाला. माणिक पाटील, ग्रामपंचायत सदस्य अशोक पोवार, उत्तम नांगरे, डॉ. नितीन महापुरे, नर्सिंग कॉलेज प्राचार्य महेश बामणी व मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वीतांसाठी संस्थाध्यक्ष डॉ. दीपक पाटील, उपाध्यक्ष सचिन पाटील, सचिव डॉ. स्वाती पाटील, स्मिता पाटील, संचालक आनंदराव पाटील, डॉ. बाबासाहेब पाटील, प्राचार्य नूरजहाँ पटेल, मोहन पाटील, ग्रामस्थांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.



संजीवनी हेल्थ कार्ड चे अनावरण करताना डॉ. दिपक पाटील सर, डॉ. स्वाती पाटील, डॉ. स्मिता पाटील, प्राचार्य डॉ. नितीन ताटपुजे, डॉ. समिर जमादार, डॉ. सुजय वाडकर व डॉ. विठ्ठल पाटील उपस्थित होते.

### गरजूंसाठी 'संजीवनी हेल्थ कार्ड योजना– डॉ. स्वाती पाटील

**नावली :** बोरपाडळे येथील संजीवनी मल्टीपर्पज फाउंडेशन संचलित संजीवनी हॉस्पिटल मार्फत बोरपाडळे आणि परिसरातील ग्रामीण भागातील सर्वसामान्य गरजू रुग्णांसाठी 'संजीवनी हेल्थ कार्ड' ही योजना सुरू करत असल्याची घोषणा फाउंडेशनच्या सचिव डॉ. स्वाती दीपक पाटील यांनी केली.

परिसरातील गरजू रुग्णांच्या आरोग्याची हेळसांड होऊ नये, दुर्लक्ष होऊ नये आणि सोई–सुविधा अभावी आरोग्याच्या गंभीर समस्या निर्माण होऊ नयेत या उद्देशाने या संजीवनी हेल्थ कार्ड योजनेचा शुभारंभ करत असल्याचे मत डॉ पाटील यांनी व्यक्त केले.

सदरची योजना एका वर्षापर्यंत मर्यादित राहिल, तसेच तिचे नुतनीकरण करता येईल. सदर योजनेत सोनोग्राफी, लॅब, एक्सरे, यावर ५० टक्के तसेच आय. पी. डी. पेशंट बिलामध्ये २० टक्के सवलत देण्यात येईल.

लाभार्थ्यांच्या तो स्वतः तसेच त्याची पत्नी, अपत्य, आई–वडील शिवाय अविवाहित भाऊ बहिण यांना या योजनेचा लाभ मिळेल. तसेच शासनामार्फत सुरू असलेल्या विविध योजना देखील या ठिकाणी उपलब्ध आहेत. परिसरातील जास्तीत जास्त गरजू रुग्णांनी या सर्व योजनांचा लाभ घ्यावा असे आवाहन डॉ पाटील यांनी केले.

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक

स्थापना १९३९

पुढारी

www.pudhari.com



बोरपाडळे : संजीवनी हेल्थ कार्डचे अनावरण करताना डॉ. दीपक पाटील, डॉ. स्वाती पाटील, डॉक्टर स्मिता पाटील, प्राचार्य डॉ. नितीन ताटपुंजे, डॉ. समीर जमादार आदी.

### गरजूंसाठी संजीवनी हेल्थ कार्ड योजना

**- डॉ. स्वाती पाटील**

**कोडोली : पुढारी वृतसेवा**

बोरपाडळे येथील संजीवनी मल्टिपर्पज फाऊंडेशन संचालित संजीवनी हॉस्पिटलमार्फत जिल्ह्यातील सर्वसामान्य व गरजू रुग्णांसाठी संजीवनी हेल्थ कार्ड ही योजना नुकतीच सुरू केली असल्याची माहिती फाऊंडेशनच्यासचिव डॉ. स्वाती पाटील यांनी दिली.

ही योजना एक वर्षापर्यंत मर्यादित राहील. तिचे नूतनीकरण करता येईल. योजनेत सोनोग्राफी, एक्स-रे तसेच ओपीडी रुग्ण बिलामध्ये सवलत देण्यात येणार आहे. या कार्डचे नुकतेच अनावरण झाल्याचे डॉ. पाटील यांनी सांगितले.

या योजनेमध्ये लाभार्थ्यांसह आई-वडील, पत्नी, अपत्य, शिवाय अविवाहित भाऊ-बहीण यांना लाभ घेता येईल. त्याचबरोबर शासनामार्फत सुरू असलेल्या विविध योजनांचा लाभदेखील या ठिकाणी घेता येईल. त्यामुळे जास्तीत जास्त गरजू रुग्णांनी या सर्व योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन डॉक्टर पाटील यांनी केले आहे.

My Kolhapur Edition
Apr 20, 2024 Page No. 19
Powered by: erelego.com



कोल्हापूर : संजीवनी हेल्थ कार्ड अनावरणप्रसंगी डॉ. दीपक पाटील, डॉ. स्वाती पाटील, डॉ. स्मिता पाटील, प्राचार्य डॉ. नितीन ताटपुजे, डॉ. समीर जमादार आदी.

### बोरपाडळेत गरजू रुग्णांसाठी 'संजीवनी हेल्थ कार्ड' योजना

कोल्हापूर , ता. २० : बोरपाडळेतील संजीवनी मल्टीपर्पज फाउंडेशन संचलित संजीवनी हॉस्पिटलतर्फे गरजू रुग्णांसाठी 'संजीवनी हेल्थ कार्ड' सुरू करण्यात आले आहे, अशी घोषणा फाउंडेशनच्या सचिव डॉ. स्वाती पाटील यांनी केली.

डॉ. पाटील म्हणाल्या, 'गरजू रुग्णांच्या आरोग्याची हेळसांड होऊ नये, या उद्देशाने कार्ड योजनेची सुरुवात केली आहे. योजना एक वर्षांपर्यंत मर्यादित राहील. तिचे नूतनीकरण करता येईल. सवलत, आयपीडी पेशंटना बिलात २० टक्के सवलत मिळेल. लाभार्थ्यांमध्ये स्वतः आणि पत्नी, अपत्य, आई-वडील याशिवाय अविवाहित भाऊ, बहीण यांना लाभ घेता येईल. शासकीय योजनाही उपलब्ध आहेत. गरजू रुग्णांनी लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. पाटील यांनी केले. कार्ड अनावरणप्रसंगी डॉ. दीपक पाटील, डॉ. स्वाती पाटील, डॉ. स्मिता पाटील, प्राचार्य डॉ. नितीन ताटपुजे, डॉ. समीर जमादार, डॉ. सुजय वाडकर, डॉ.